# मेहकर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात

( पिठासीन अधिकारी अ.अ. शेख )

MHBU210008612024

**नियमीत दिवाणी दावा क्र.२४५/२०२४**

श्रीमती अर्चना शाम सावळे व इतर

–विरुध्द–

मुख्याधिकारी, नगर परिषद मेहकर व इतर

## तात्पुरता मनाई अर्ज निशाणी क्र.५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अनुसार दाखल करुन असे कथन केले आहे की, मौजे मेहकर, ता. मेहकर जि. बुलढाणा येथील नगर परिषद हद्दीतील वार्ड क्र.७ मधील नविन मालमत्ता क्र.MEHK00006290 (जुना मालमत्ता क्र.Z17003642) ज्याचा मॅन्युअल क्र.३२९/७ असुन सदर जागेत हॉटेल जगदंबा या नावाने वादी क्र.१ ते ३ हे मागील २० वर्षापासुन व्यवसाय करीत आहेत. (यापुढे वर नमुद हॉटेल जागेस "वाद मिळकत असे संबोधण्यात येईल.")

२. वाद मिळकत वादी क्र.१ चे पती व वादी क्र.२ व ३ चे वडील नामे शाम पांडुरंग सावळे यांना तहसिल कार्यालय मेहकर यांचेकडून सन २००६–०७ ते २००८–०९ या तीन वर्षाच्या कालावधीकरीता भाडेपट्ट्यावर मिळालेली होती. तदनंतर कायदेशीर तांत्रीक अडचणीमुळे तहसिल कार्यालय मेहकर यांनी पुढील भाडेपट्ट्याची मुदत शाम पांडुरंग सावळे यांना वाढवुन दिली नाही. शाम पांडुरंग सावळे यांच्या मृत्युनंतर वाद मिळकत वादी क्र.१ ते ३ यांच्या ताब्यात आली. वादींनी वादमिळकतीची नोंद नगरपरिषद मेहकर यांच्या अभिलेखात करुन घेतली आणि मिळकतीची कर नियमीतपणे जमा केलेली आहे. वाद मिळकतीवर असलेल्या हॉटेल जगदंबाच्या उत्पन्नावर वादी यांचे कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरु आहे.

३. पुढे अर्जातील कथन की, वाद मिळकतीची प्रतिवादी क्र.१ नगर परिषद व प्रतिवादी क्र.२ तहसिल कार्यालय मेहकर यांना कोणत्याही शासकीय कामाकरीता

अथवा इतर कोणत्याही प्रयोजनाकरीता आवश्यकता नसतांना फक्त राजकीय द्वेषापोटी वादींना दिनांक २९/०८/२०२४ रोजी नोटीस पाठवुन वाद मिळकतीवरील अतिक्रमण काढुन देणेबाबत समज दिली. वास्तविकपाहता वाद मिळकतीशी नगर परिषद मेहकर यांचा कोणताही संबंध नसतांना त्यांना वर नमुद नोटीस पाठवण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. वर नमुद नोटीसच्या आधारे प्रतिवादी हे वाद मिळकतीतुन वादींना बेदख करण्याच्या प्रयत्नात आहेत. तसे झाल्यास वादींचा हॉटेल व्यवसाय बंद पडून त्यांचे उत्पन्नाचे साधन नाहीसे होणार आहे. पुढे असे कथन केले की, वाद मिळकतीवर वादींचा कायदेशीर ताबा असल्याबाबत त्याने सुकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा सादर केला आहे. तरी प्रस्तुत दाव्याचा निकाल होईपावेतो प्रतिवादींनी दिनांक २९/०८/२०२४ रोजीच्या नोटीसच्या आधारे वाद मिळकतीतुन वादींना बेदखल करु नये किंवा त्यांच्या ताबे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करु नये, असा तात्पुरता मनाई आदेश देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र.१ मुख्याधिकारी नगर परिषद मेहकर यांनी त्यांचे लेखी म्हणणे निशाणी क्र.१६ अनुसार दाखल करुन अर्जातील संपुर्ण मजकुर नाकारलेला आहे. त्यांचे कथन की, वाद मिळकत शाम पांडुरंग सावळे यांना तहसिलदार मेहकर यांच्या आदेशान्वये सन २००६–०७ ते २००८–०९ या तिन वर्षांच्या कालावधीकरीता भाडेपट्ट्यावर व्यवसायासाठी दिलेली होती, हे दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा वादींनी सादर केलेला नाही. वाद मिळकत शासनाची असुन तशी नोंद संबंधीत ७/१२ उतारा व नगर परिषद मेहकर यांच्याकडील अभिलेखात नमुद आहे. वादींनी वाद मिळकतीवर अतिक्रमण केल्याची बाब नाकारलेली नाही.

५. पुढे प्रतिवादी क्र.१ यांचे कथन की, वाद मिळकत ही महसुल

विभागाची आहे. वाद मिळकत महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या १३२ केव्ही केंद्राच्या बाजुला असुन मेहकर–जानेफळ मुख्य १२० फुटी रस्त्याच्या लगत आहे. वाद मिळकतीच्या मागील बाजुस जल शुध्दीकरण केंद्र व अग्नीशामक दलाचे ठिकाण आहे. अग्नीशामक दलातील वाहनांना मेहकर–जानेफळ मुख्य रस्त्यावर येण्यासाठी वाद मिळकत व त्या लगतची जागा सोडण्यात आलेली आहे. परंतु, वादीसह इतर लोकांनी सदर जागेवर अतिक्रमण करुन अग्नीशामक दलाच्या वाहनांना बाहेर पडण्यास अडथळा निर्माण केला आहे. वाद मिळकतीवर वादींनी केलेल्या अतिक्रमणामुळे अग्नीशामक दलाच्या वाहनांना वेळप्रसंगी बाहेर पडण्यासाठी नाइलाजास्तव छोट्या रस्त्याचा वापर करावा लागत आहे. वाद मिळकत ही महसुल विभागाची असुन नगर परिषद मेहकर यांना येण्याकरीता दुसरा पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. तरी वरील कारणाचा विचार करुन प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

६. प्रतिवादी क्र.२ तहसिलदार मेहकर यांनी त्यांचे लेखी म्हणणे निशाणी क्र.२१–अ अनुसार दाखल करुन अर्ज मंजुर करण्यास विरोध दर्शवला आहे. त्यांचे कथन की, वाद मिळकत शासनाच्या मालकीची असुन सदर मिळकतीवर वादींनी अतिक्रमण करुन बेकायदेशीररित्या हॉटेल व्यवसाय सुरु केला आहे. वाद मिळकत शाम पांडुरंग सावळे यांना ३ वर्षांच्या कालावधीकरीता भाडेपट्ट्याने देण्यात आली होती, हे दाखवणारा कोणताही दस्त वादींनी सादर केला नाही. तहसिल कार्यालय मेहकर यांनी वादींच्या हक्कात कोणतेही भाडेपट्टे दस्त वाढवुन दिलेले नाही. शाम पांडुरंग सावळे हे मयत झाल्यामुळे तथाकथीत भाडेपट्टाचा दस्त त्यांचे वारसांच्या नावे हस्तांतर होउ शकत नाही.

७. पुढे प्रतिवादी क्र.२ चे कथन की, वाद मिळकत मेहकर–जानेफळ १२० फुटी मुख्य रस्त्याच्या लगन असुन वाद मिळकतीच्या मागील बाजुस नगर

परिषद मेहकर यांचे जलशुध्दीकरण केंद्र व अग्नीशामक दलचे ठिकाण कार्यरत आहे. अग्नीशामक दलातील वाहनांना मुख्य रस्त्यावर येण्याकरीता वाद मिळकत व त्याच्या लगतची जागा सोडण्यात आलेली होती. परंतु, वादींनी वाद मिळकतीवर अतिक्रमण करुन हॉटेल व्यवसाय सुरु केल्यामुळे अग्नीशामक दलाच्या वाहनांना मुख्य रस्त्यावर येण्यास अडचण निर्माण होत आहे. अग्नीशामक दलाचे वाहन वेळप्रसंगी जलशुध्दीकरण केंद्राच्या समोरील २५ फुटाच्या रस्त्याचा वापर करावा लागत आहे. परंतु, सदर रस्त्याच्या लगत एक हॉस्पीटल व कोचींग क्लासेसचा हॉल बांधण्यात आला असल्याकारणाने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. यदाकदाचीत मेहकर शहरात आगेची घटना घडल्यास अग्नीशामक दलाच्या वाहनांना घटनास्थळी पोहोचण्यास विलंब लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तरी वरील कारणाचा विचार होउन वादींचा अर्ज खर्चासह नामंजुर व्हावा अशी विनंती केली आहे.

८. उभय पक्षांचे कथन व दाखल कागदपत्रांवरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेले असून, त्यांचे निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादींनी प्रस्तुत अर्जासंदर्भात प्रथमदर्शनी पुरावा सादर केला आहे काय ? | ...नकारार्थी |
| २) | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | ...नकारार्थी |
| ३) | अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | ...नकारार्थी |
| ४) | कोणता आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

९. उभयपक्षांनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठयर्थ आवश्यक ते कागदपत्र सादर केलेले आहेत.

१०. उभयपक्षांच्या विधीज्ञांचा युक्तवाद ऐकण्यात आला.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करीताः–</u>**

११. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्याची चर्चा एकत्रीत करण्यात येत आहे. उभयपक्षांच्या लेखी कथनावरुन असे दिसुन येते की, वाद मिळकत महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या १३२ केव्ही केंद्राच्या बाजुला असुन मेहकर–जानेफळ मुख्य १२० फुटी रस्त्याच्या लगत आहे. वाद मिळकतीच्या मागील बाजुस जल शुध्दीकरण केंद्र व अग्नीशामक दलाचे ठिकाण आहे. पुढे असेही दिसुन येते की, वाद मिळकत शासनाच्या मालकीची असुन सदर मिळकतीवरील अतिक्रमण काढण्याबाबत नगर परिषद मेहकर यांनी वादींना दिनांक २९/०८/२०२४ रोजी नोटीस पाठवली आहे.

१२. वादींच्या कथनानुसार वाद मिळकत शाम पांडुरंग सावळे यांना तहसिल कार्यालय यांच्याकडील आदेशान्वये सन २००६–०७ ते २००८–०९ या तिन वर्षांच्या कालावधीकरीता भाडेपट्ट्यावर दिलेली होती. परंतु, वादींनी त्यांच्या कथनाच्या पुष्ट्यर्थ तसा भाडेपट्ट्याचा दस्त किंवा तहसिल कार्यालयाकडील आदेशाची प्रत दाखल केली नाही. वादींनी प्रस्तुत अर्जात केलेल्या कथनावरुन असे दिसुन येते की, शाम पांडुरंग सावळे यांच्या मृत्युनंतर ते वाद मिळकतीवर अतिक्रमण करुन हॉटेल व्यवसाय सुरु केलेला आहे. वाद मिळकतीची नोंद नगर परिषद मेहकर यांच्या अभिलेखात असुन त्याप्रमाणे वादी हे वाद मिळकतीचे कर जमा करत असल्याचे दिसुन येत आहे. वादींच्या नावे नगर परिषद मेहकर येथील अभिलेखात नोंद असल्यामुळे वाद जागेवरील त्यांचा ताबा कायदेशीर आहे, असा निष्कर्श काढता येणार नाही.

१३. प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या लेखी जबाबावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, अग्नीशामक दलातील वाहनांना मेहकर–जानेफळ मुख्य रस्त्यावर येण्यासाठी

वाद मिळकत व त्या लगतची जागा सोडण्यात आलेली आहे. परंतु, वादीसह इतर लोकांनी सदर जागेवर अतिक्रमण करुन अग्नीशामक दलाच्या वाहनांना बाहेर पडण्यास अडथळा निर्माण केला आहे. वाद मिळकतीवर वादींनी केलेल्या अतिक्रमणामुळे अग्नीशामक दलाच्या वाहनांना वेळप्रसंगी बाहेर पडण्यासाठी नाइलाजास्तव छोट्या रस्त्याचा वापर करावा लागत आहे. पुढे असे दिसुन येते की, यदाकदाचीत मेहकर शहरात आगेची घटना घडल्यास अग्नीशामक दलाच्या वाहनांना घटनास्थळी पोहोचण्यास विलंब लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांच्या लेखी जबाबात केलेले कथन न्यायालयास संयुक्त व योग्य वाटत आहे. वाद जागेवर वादींचे अतिक्रमण असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे आणि सदरचे अतिक्रमण प्रतिवादी क्र.१ व २ यांना कायदेशीर मार्ग अवलंबुन हटवण्याचा अधिकार प्राप्त आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज वादींच्या मागणीअनुसार मंजुर होण्यास पात्र नाही. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.४ करीताचे निष्कर्षार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.५ नामंजूर करण्यात आला.

२. खर्चाबाबत हुकूम नाही.

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2025.02.07 14:40:40 +0530

(अ. अ. शेख)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मेहकर.

दिनांकः ०७/०२/२०२५

## CERTIFICATE

| | |
|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order. | |
| Name of the Steno. Grade II | Balkrishna M. Shilwant. |
| Court | Civil Judge Senior Division, Mehkar. |
| Date | 07/02/2025 |
| Order signed by the presiding officer on | 07/02/2025 |
| Order uploaded on | 07/02/2025 |